Work is Worship

DESHBHAKT BABASAHEB BHAUSAHEB KHANJIRE SHIKSHAN SANSTHA'S

# NIGHT COLLEGE OF ARTS & COMMERCE, ICHALKARANJI.

## Achievement of the Cultural Department

The cultural department of our college is active and the students of the college enriched through their valuable contribution.

### 2010-11

The year started with the innovative programme arranged by St. Xavier's College, Mumbai. The said college organized A One Day Seminar for the Night Colleges. Our students participated in the seminar by presenting a PPT programme on 'Progress and Achievements of Disadvantaged Students Due to the Higher Education in Night College." The following students represented the college and were greatly appreciated by the spectators.

In the youth festival organized by Shivaji University Kolhapur our college participated

Zonal Level – IInd Prize in Street Play 'Wo Saat Din' on the national integration.

Inter Zonal Level – The same street play was presented.

One student Deepak Bawadekar B. A. Part II got selected in the Shivaji University Team for State Level Youth Festival “”INDRADHANUSHYA” 2010 and West Zone (National) Youth Festival 2010 by AIU (Association of Indian University)

In the ssame academic year our students participated in International Youth Festival 'BANI THANI' Organized by Maharshi Dayanand Saraswati University, Ajmer (Rajasthan)

In this International Youth Festival our students got spectaculars success

1) Mime – Ist Prize
2) Rangoli – Ist Prize
3) Poster Making – Ist Prize

The cultural Department is always aware about the social problems.

We performed street play on Female Phoeticide 'Hyala Jababdar Kon' 30 performances were performed by our students. The programme was collaborated with Samajwadi Probodhini and Lions Club of Ichalkaranji.

Thus the year was completed with various activities.






**Social Awareness Programme Steert Play on Female Phoeticide**

**Street Play On National Integrity**

# मराठी दिनानिमित्त रसिकांची दाद घेणाऱ्या एकांकिका सादर

तरुण भारत - 3/4/2011

▶ इचलकरंजी / प्रतिनिधी

येथील मनोरंजन मंडळ आणि रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी सेंट्रल यांच्यावतीने प्रतिवर्षीप्रमाणे कविश्रेष्ठ कुसुमाग्रज जन्म दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या मराठी दिन उत्सव उपक्रमात दुसऱ्या दिवशी 'रंगभूमी' या कार्यक्रमांतर्गत रसिकांची दाद घेणाऱ्या तीन एकांकिका श्रीमंत घोरपडे नाट्यगृहात सादर करण्यात आल्या.

कार्यक्रमाच्या सुरवातीला येथील प्रसिद्ध उद्योजक सुनिल मराठे यांच्या हस्ते नटराज प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी मनोगत व्यक्त करताना त्यांनी 'संयोजकांच्या अशा उपक्रमांमुळे मुंबई-पुण्यात पहावयास मिळणारे कार्यक्रम इचलकरंजी शहरातील रसिकांना पहावयास मिळतात हे कौतुकास्पद आहे.' अशा आशयाचे उद्‌गार काढले. स्वागतपर मनोगत, मनोरंजन मंडळाचे अध्यक्ष ओम पाटणी यांनी केले तर पाहुण्यांना गुलाब पुष्प प्रदान रोटरी क्लब सेंट्रलचे अध्यक्ष अजित राठे यांनी केले. यावेळी एकांकिका सादर करणाऱ्या तीनही संस्थांचे प्रतिनिधी मिलिंद दांडेकर, योगेश वाटवे आणि अमोल कुलकर्णी यांनीही नटराज प्रतिमेचे पूजन केले.

'रंगभूमी' कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री गणेश ग्रंथालय व सांस्कृतिक मंडळ सांगली निर्मित 'साडेसहा रुपयांचं काय केलंस ?' ही मिश्कील विनोदी एकांकिका सादर करण्यात आली. नोकरी करणारी कमावती बायको, कलावंत पण बेकार फिरणारा नवरा आणि त्या दोघातील रुसवा फुगवा, भांडण तंटा व शेवटी पुन्हा त्यांचे एकमेकातील प्रेम अशी कथा या एकांकिकेतून मांडण्यात आली.

सरिता मेहेंदळे (माधवी) आणि अनुप बेलवलकर (प्रदीप) या दोघांचाही अभिनय लक्षवेधी होता. लेखन किरण पोत्रेकर यांचे होते तर दिग्दर्शन श्रीनिवास जरंडीकर यांचे होते. त्याचबरोबर हरीहर म्हैसकर व आयुब ऐनापुरे (नेपथ्य), प्रताप सोनाळे (प्रकाश योजना), शशांक लिमये (पार्श्वसंगीत) आणि अमोल कुलकर्णी व संजय रुपलग (रंगमंच व्यवस्था) यांनी तांत्रिक बाजू सांभाळली.



**इचलकरंजी :** मराठी दिनानिमित्त रंगभूमी कार्यक्रमात 'तमाशा ऑफ ह्युमॅनिटी' ही एकांकीका सादर करताना चॅलेंजर्स ग्रुपचे कलाकार.

कार्यक्रमात त्यानंतर सस्नेह कला क्रीडा व सांस्कृतिक मंडळ सांगलीतर्फे 'साठा उत्तराची कहाणी' ही एकांकिका प्रभावीपणे सादर करण्यात आली. अंथरुणावर पडून असलेली वृद्ध पत्नी आणि तिची सर्व काळजी घेणारा वृद्ध पती यांची कथा आणि व्यथा या एकांकिकेमधून मांडण्यात आली. शेवटी देहदान करण्याचा संदेश या एकांकिकेतून देण्यात आला. नाना आणि नानी या प्रमुख वृद्ध व्यक्तीरेखा उदय गोडबोले आणि जुई बर्वे यांनी प्रभावीपणे वटवल्या. लेखन योगेश सोमण यांचे होते तर दिग्दर्शन योगेश वाटवे यांचे होते. नेपथ्य – मुकुंद पटवर्धन, प्रकाश योजना – गणेश वाटवे, पार्श्वसंगीत – निर्भय विस्पुते आणि रंगभूषा-इलाही खलिफा यांनी तांत्रिक जबाबदारी पार पाडली.

कार्यक्रमाच्या शेवटी रंगयात्रा नाट्यसंस्था निर्मित व चॅलेंजर्स ग्रुप इचलकरंजी प्रस्तुत 'तमाशा ऑफ ह्युमॅनिटी' ही उपरोधक विनोदी शैलीमधील एकांकिका सादर करण्यात आली. आनंद म्हसवेकर यांनी लिहिलेली ही एकांकिका मिलिंद दांडेकर यांनी दिग्दर्शीत केली होती. एका भिकाऱ्याची व्यथा सांगणारी ही एकांकिका लोकनाट्याच्या व मुक्तनाट्याच्या शैलीत युवक कलाकारांनी उत्स्फूर्तपणे सादर केली. यामध्ये रवींद्र गेजगे, चंद्रकांत मधाळे, दीपक बावडेकर, वैभव डावरे, दिगंबर मस्कर, अनिरुद्ध दांडेकर, याकुब डांगे, सिद्धू सुतार, सचिन व संदीप घाटगे, अमित ढवळे आणि मंजुनाथ कोरवी यांनी अभिनयाची जबाबदारी पार पाडली तर सचिन कांबळे (पार्श्वसंगीत), सजाकअली जमादार (प्रकाश योजना), सुयश शहा (नेपथ्य) आणि सिद्धू सुतार (रंगभूषा व वेशभूषा) यांनी तांत्रिक जबाबदारी पार पडली.